**ठळक बातम्या**

- जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीचे प्रतिनिधित्व करणारी भारतीय संसद, संविधानकर्त्यांनी मांडलेल्या स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुत्वाच्या आदर्शांवर पुढे जात असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- २६/११ च्या मुंबई हल्ल्यातल्या शहिदांना आदरांजली

- कोल्हापूरचे अरविंद पाटील आणि अहिल्यानगरच्या श्रद्धा ढवण यांना राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कार आज प्रदान करण्यात येणार

**आणि**

- दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा दुसरा क्रिकेट कसोटी सामना आणि मालिकाही भारताने गमावली

**<><><><><>**

देशभरात आज संविधान दिवस साजरा केला जात आहे. "हमारा संविधान - हमारा स्वाभिमान" ही यंदाची संकल्पना आहे. नवी दिल्लीत संविधान सदनाच्या मध्यवर्ती सभागृहात झालेल्या मुख्य सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, लोकसभेचे सभापती ओम बिरला, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यसभेतले सभागृह नेते जेपी नड्डा, तसंच दोन्ही सभागृहातले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे आणि राहुल गांधी आणि संसद सदस्य सहभागी झाले होते. राष्ट्रपतींच्या नेतृत्वाखाली सर्वांनी संविधानाच्या प्रस्तावनेचं वाचन केलं. जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीचे प्रतिनिधित्व करणारी भारतीय संसद, आपल्या संविधानकर्त्यांनी मांडलेल्या स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुत्वाच्या आदर्शांवर पुढे जात आहे, असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या. गेल्या दशकात, भारताने जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने सातत्याने प्रगती केली आहे,

संविधानकारांच्या दूरदृष्टीचं आणि त्यांनी व्यक्त केलेल्या आकांक्षांचं हे फलित असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड - बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

या कार्यक्रमात संविधानाच्या मराठीसह ९ भाषांतल्या अनुवादाचं प्रकाशन राष्ट्रपतींच्या हस्ते झालं.

संविधान दिवसानिमित्त आज राज्यात सर्वत्र सरकारी आणि निमसरकारी कार्यालयं, आस्थापना तसंच विविध संस्था संघटनांमधे संविधानाच्या प्रस्तावनेचं वाचन करण्यात येत असून संविधानकर्त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालघर जिल्ह्यात डहाणू इथं आयोजित कार्यक्रमात संविधानाच्या उद्देशिकेचं सामूहिक वाचन केलं. मुंबईत राजभवन इथं राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी, कर्मचारी आणि पोलिसांनी आज भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केलं.

आकाशवाणीच्या देशभरातल्या केंद्रांप्रमाणेच मुंबईतल्या प्रसारण भवन कार्यालयातही संविधानदिनानिमित्त उद्देशिका वाचन करण्यात आलं.

**सांगलीत** संविधान दिनानिमित्त आयोजित रॅलीला जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी हिरवा झेंडा दाखवला. त्यापूर्वी संविधान उद्देशिकेचं सामूहिक वाचन करण्यात आलं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज **नागपूर** विद्यापीठाच्या वतीने आज नागपुरात सामूहिक संविधान उद्देशिका वाचन आणि संविधान पदयात्रा दिंडी काढण्यात आली.

**<><><><><>**

संविधान दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनतेला उद्देशून एक पत्र लिहीलं आहे. नागरिकांनी कर्तव्याला प्राधान्य द्यावं तसंच आपला मताधिकार बजावून लोकशाही बळकट करावी असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी त्यात केलं आहे. देशाच्या प्रगतीसाठी संविधान सदैव मार्गदर्शक राहील असं त्यांनी यात म्हटलं आहे.

डॉ राजेंद्र प्रसाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणेच संविधान सभेतल्या अनेक महिला सदस्यांच्या दूरदृष्टीमुळे संविधान समृद्ध झालं असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याला आज १७ वर्ष पूर्ण झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या हल्ल्यातल्या शहीदांना श्रद्धांजली वाहिली आहे. देशातल्या प्रत्येक नागरिकानं कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाचा विरोध करावा आणि मजबूत तसंच अधिक वैभवशाली भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी वाटचाल करावी, असं आवाहन राष्ट्रपतींनी केलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग तसंच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुंबई दहशतवादी हल्ल्यातल्या शहीदांना श्रद्धांजली वाहिली आहे. दहशतवाद हा फक्त एखाद्या देशासाठी नव्हे तर संपूर्ण मानवजातीसाठी अभिशाप आहे, असं शाह यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलं आहे.

मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री आशीष शेलार आणि मंगल प्रभात लोढा यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथल्या पोलीस शहीद स्मारकावर जाऊन शहीदांना वंदन केलं आणि पीडितांना श्रद्धांजली वाहिली. राज्याचे पोलीस महासंचालक आणि मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनीही शहीदांना आदरांजली वाहिली.

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील हुतात्म्यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय सुरक्षा दल अर्थात एनएसजीतर्फे आज संध्याकाळी गेट वे ऑफ इंडिया इथं एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अशा प्रकारचे हल्ले पुन्हा होऊ नयेत यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी केला जाणार आहे. मुंबईतल्या ११ महाविद्यालयं आणि २६ शाळांमधले विद्यार्थी या शपथग्रहण कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. ‘कधीही नाही‘ या संकल्पनेअंतर्गत युवकांमध्ये शांतता,

सतर्कता आणि राष्ट्रीय सुरक्षा या मूल्यांच्या बळकटीकरणासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही मुंबई हल्ल्यातल्या शहीदांना आणि बळी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. दहशतवादाविरोधात देश नेहमी एकजुटीनं उभा राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात रोजगारनिर्मितीच्या दृष्टीनं वाढवण बंदर उभारण्यात येत असून ते पूर्ण झाल्यावर जिल्ह्यात १० लाख रोजगारनिर्मिती होईल आणि स्थानिकांना प्राधान्यानं नोकऱ्या दिल्या जातील, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलं. तसंच स्थानिक मच्छीमार बांधवांना कौशल्य प्रशिक्षण दिलं जाईल, असंही ते म्हणाले.

<><><><><>

देशी दुधाळ पशु पालनासाठीचा राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कार कोल्हापूरचे शेतकरी अरविंद यशवंत पाटील आणि अहिल्यानगरच्या श्रद्धा ढवण यांना आज प्रदान करण्यात येणार आहे. ५ लाख रुपये रोख, मानचिन्ह आणि सन्मानपत्र स्वरुपाचा हा पुरस्कार राष्ट्रीय दुग्धदिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात केंद्रीय पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंग यांच्या हस्ते प्रदान केला जाईल. पशुधन आणि दुग्ध व्यवसाय क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी अनेक उपक्रमांचा प्रारंभ या कार्यक्रमात होईल.

<><><><><>

गोव्यात सुरू असलेल्या ५६व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पण श्रेणीत आज द डेव्हिल्स स्मोक हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाचं दिग्दर्शन अर्नेस्टो मार्टिनेझ बुसिओ यांनी केलं

असून त्यांनी या प्रदर्शनाला हजेरी लावली. या चित्रपटाने यंदाच्या बर्लिनेल आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळवला आहे. या चित्रपटाच पाच भावंडं आणि त्यांच्या आजीची कथा दाखवण्यात आली आहे.

<><><><><>

गुवाहाटी इथं बारसापारा स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्यात भारताचा पराभव झाला असून ही मालिका भारताने गमावली आहे. काल सामन्याच्या चौथ्या दिवशी खेळ संपला तेव्हा भारतासमोर ५५० धावांचं आव्हान होतं. आज पाचव्या दिवशी २ बाद २७ वरून सुरू झालेला भारताचा डाव अवघा १४० धावांत आटोपला. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ४८९ तर दुसऱ्या डावात २६० धावा केल्या होत्या. भारताचा संघ पहिल्या डावात २०१ तर दुसऱ्या डावात १४० धावा करून तंबुत परतला. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेनं हा सामना ४०८ धावांनी जिंकला. दुसऱ्या डावात भारताकडून रविंद्र जडेजाने सर्वाधिक ५४ धावा केल्या. उर्वरित बहुतांश फलंदाज २०चा आकडाही गाठू शकले नाहीत. दक्षिण आफ्रिकेनं ही मालिका २-०नं जिंकली आहे.

<><><><><>

धाराशिव जिल्ह्यातल्या शाळांमधे बालविवाहाविरोधी जनजागृती अभियान राबवलं जात आहे. यासाठी चाइल्ड हेल्पलाईनचे सदस्य विविध शाळांमधे जाऊन विद्यार्थ्यांना  बालहक्क, तसंच बालविवाहामुळे होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल समजावून सांगत आहेत. यावेळी चाइल्ड हेल्पलाईन १०९८ वर मदत मागण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. यात शिक्षक, कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

//<><><><><>//